No 14572

दिनांक 20 DEC 2018

महानिर्मिती

**जाहिरात क्र. ०१ (जाने)/२०१७ अंतर्गत "रसायनशास्त्रज्ञ" (Chemist) या पदाकरीता वैयक्तिक मुलाखत परिक्षेस उपस्थित राहण्याबाबत.**

# अधिसूचना

**संदर्भ** : १. महानिर्मिती जाहिरात क्र. ०१ (जाने)/२०१७
२. मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर येथे दाखल याचिका क्र.४००३/२०१७
३. महानिर्मिती कंपनी अधिसूचना दि. २८.११.२०१८.
४. महानिर्मिती कंपनी अधिसूचना दि. ३०.११.२०१८.

---

"रसायनशास्त्रज्ञ" (Chemist) या पदाच्या ऑनलाईन परीक्षेतील प्राप्त गुणांची सुधारीत यादी आणि सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेऊन आणि जाहिरातीत नमूद अटी व शर्तींच्या अधीन राहून वैयक्तिक मुलाखत परीक्षेकरीता १:२ प्रमाणात पात्र ठरलेल्या उमेदवारांची तयार करण्यात आलेल्या यादीच्या अनुषंगाने खालील नमूद उमेदवारांची वैयक्तिक मुलाखत परीक्षा दि.२९.१२.२०१८ रोजी सकाळी ठिक.११.०० वाजता आयोजित करण्यात आलेली आहे.

**प्रवर्ग - खुला (Open)**

| अनु क्र. | परीक्षार्थी क्रमांक | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग | वैयक्तिक मुलाखत परीक्षेकरीताचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | ११०२११०१९८८ | श्री.पडोळे निलेश सुरेशराव | खुला | खुला |
| २ | ११०२११२९९५४ | श्री.मदन राजेंद्र बिरादर | खुला | खुला |
| ३ | ११०२११२५९९४ | तांबोली खुशबु युनुस | खुला | खुला महिला आरक्षण |
| ४ | ११०२११२९८८७ | श्री.बालाजी कदम | खुला | खुला खेळाडू आरक्षण |

**प्रवर्ग - अनुसूचित जाती (SC)**

| अनु क्र. | परीक्षार्थी क्रमांक | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग | वैयक्तिक मुलाखत परीक्षेकरीताचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | ११०२१११८०९० | श्रध्दा अभिमन्यू मेश्राम | अनुसूचीत जाती | अनुसूचीत जाती महिला आरक्षण |

**प्रवर्ग - विमुक्त जाती-अ (VJ-A)**

| अनु क्र. | परीक्षार्थी क्रमांक | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग | वैयक्तिक मुलाखत परीक्षेकरीताचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | ११०२११२५८८७ | श्री.जयदीप विश्वनाथ राठोड | वि.जा.-अ | वि.जा.-अ |

तरी वरील तक्त्यातील उमेदवारांनी वैयक्तिक मुलाखतीसाठी दि. २९.१२.२०१८ रोजी खालील नमूद पत्यावर सकाळी ठिक.११.०० वाजता उपस्थित रहावे. वरील उमेदवारांना कागदपत्रे पडताळणी प्रक्रियेकरीताची सूचना लवकरात लवकर महानिर्मिती कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

वैयक्तिक मुलाखत परीक्षेकरीताचा पत्ता:- M/s Attest Testing Services Ltd.,
Compound of New Heaven Enterprises Pvt. Ltd.,
2nd Floor, 49 H, Parsi Panchayat Road, Andheri (E),
Mumbai- 400069.
(Landmark- Above ICICI Skill Training Centre)

उपरोक्त वैयक्तिक मुलाखतीसाठी हजर होतेवेळी उमेदवारांनी खालील अटी व शर्तीचे / सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे:-

१) उमेदवारांची वैयक्तिक मुलाखत परीक्षेकरीता निवड ही उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेत प्राप्त झालेल्या गुणांनुसार तसेच उमेदवारांनी सिस्टीम जनरेटेड अर्जामध्ये दर्शविलेली त्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव,वय, जात, उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे, महिला आरक्षण, खेळामधील प्राविण्य, शारीरिक बाधित व्यंगत्वाचे प्रमाण, इत्यादी माहितीच्या आधारे करण्यात आलेली असून त्या बाबतचे मूळ प्रमाणपत्राची कागदपत्रे पडताळणीवेळी तपासणी करण्यात येईल.

२) वैयक्तिक मुलाखत परीक्षेकरीता तात्पुरती निवड करण्यात आलेल्या सर्व उमेदवारांनी त्यांची शैक्षणिक अर्हता,अनुभव, वय , जात, उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे, महिला आरक्षण, खेळामधील प्राविण्य, शारीरिक बाधित व्यंगत्वाचे प्रमाण, इत्यादी सर्व मूळ प्रमाणपत्रे, कागदपत्रे पडताळणीवेळी सादर करणे बंधनकारक राहील व ती सादर करु न शकल्यास उमेदवाराची निवड तात्काळ रद्द करण्यात येईल.

३) वैयक्तिक मुलाखत परीक्षेकरीता तात्पुरत्या निवड यादीत नावाचा समावेश आहे म्हणून नेमणूक देण्याबाबत कोणताही हक्क उमेदवारांना राहणार नाही. ही निवड यादी पूर्णत: जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव आणि इतर अटी व शर्ती पूर्ण करण्याच्या अधीन राहून तयार करण्यात आलेली आहे.

४) "रसायनशास्त्रज्ञ" (Chemist) या पदासाठी आवश्यक असलेली पूर्वावश्यकता धारण करीत नसल्याचे किंवा नेमणूकीसाठी आवश्यक असलेल्या अटींचा किंवा जाहिरातीमधील कोणत्याही अटीचा व शर्तीचा भंग होत असेल तर संबंधीत उमेदवारांची निवड कोणत्याही टप्प्यावर ताबडतोब रद्द करण्यात येईल.

५) जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे उमेदवारांजवळ असलेली सर्व आवश्यक प्रमाणपत्रे/ कागदपत्रे (शैक्षणिक अर्हता व अनुभव वगळून) ही जाहिरातीस अनुसरुन "रसायनशास्त्रज्ञ" (Chemist) या पदाकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज करताना कागदपत्रे पडताळणीच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेली असणे व कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी वैध असणेआवश्यक आहे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. यापूर्वीची कागदपत्रे पडताळणी दि. ०४.०८.२०१७ रोजी झालेली असल्याने, सदरील कागदपत्रे दि. ०४.०८.२०१७ रोजी वैध असणे आवश्यक आहे. ज्या उमेदवारांजवळ आवश्यक प्रमाणपत्रे /कागदपत्रे ही कागदपत्रे पडताळणीच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेली नसतील व कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी वैध नसतील अशा उमेदवारांची उमेदवारी ताबडतोब रद्द करण्यात येईल व सदर प्रकरणी कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल महानिर्मिती कंपनीतर्फे घेण्यात येणार नाही. तसेच उमेदवाराने जाहिरातीत नमूद शैक्षणिक अर्हता व अनुभव हा जाहिरातीस अनुसरुन "रसायनशास्त्रज्ञ" (Chemist) या पदाकरीता ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना जाहिरातीच्या शेवटच्या दिनांकास धारण करीत असणे आवश्यक आहे.

६) वैयक्तिक मुलाखत परीक्षेनंतर खेळाडू आरक्षणाअंतर्गत (SP) निवड करण्यात येणाऱ्या उमेदवारांची खेळाडू प्रमाणपत्रे महाराष्ट्र शासन निर्णय क्र. राक्रीधो.२००२/प्र. क्र.६८/क्रीयुसे-२/ दिनांक ०१.०७.२०१६ अन्वये तसेच वेळोवेळी झालेल्या शासन निर्णयातील सुधारणांच्या अनुषगांने "रसायनशास्त्रज्ञ" (Chemist) या पदाच्या निवडकरीता वैध आहेत अथवा नाहीत याबाबतच्या अहवालाकरीता संबंधित उप संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे पाठविण्यात येतील. सदर उमेदवारांच्या खेळाडू प्रमाणत्राच्या वैधतेबाबतचा अहवाल संबंधित उप संचालक, क्रिडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतरच पात्र उमेदवारांना नियुक्तीपत्र देण्यात येतील याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

७) वैयक्तिक मुलाखत परीक्षेनंतर "रसायनशास्त्रज्ञ" (Chemist) या संवर्गातील "रसायनशास्त्रज्ञ" (Chemist) या पदाच्या तात्पुरत्या निवड यादीकरीता पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी प्रक्रिया पार पाडण्यात येऊन कागदपत्रे पडताळणीत उमेदवार अपात्र आढळून आल्यास संबंधित उमेदवारांची निवड कोणत्याही टप्प्यावर ताबडतोब रद्द करण्यात येईल.

८) "रसायनशास्त्रज्ञ" (Chemist) या पदाच्या वैयक्तिक मुलाखत परीक्षेकरीता १:२ प्रमाणात पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी ही मा.सक्षम अधिकारी यांनी दिलेल्या मंजूरीने प्रसिध्द करण्यात आली आहे. "रसायनशास्त्रज्ञ" (Chemist) या पदाच्या कागदपत्रे पडताळणी करण्याकरीताची यादी घोषित करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे. तथापि, अनावधनाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करण्याचा अधिकार महानिर्मिती कंपनीने राखून ठेवलेला आहे.

९) जाहिरात क्र. ०१(Jan)/२०१७ च्या भरती प्रक्रियेचा अभिलेख निकाल घोषित केल्याच्या दिनांकापासून तीन (३) महिन्याच्या कालावधीसाठी जतन करण्यात येईल. त्यापुढील काळात कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

१०) अयशस्वी उमेदवारांनी कोणत्याही प्रकारचे पत्रव्यवहार महानिर्मिती कंपनीकडे करु नये. उमेदवारांच्या कोणत्याही पत्र व्यवहाराची महानिर्मिती कंपनीकडून दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

कार्यकारी संचालक (मासं)
महानिर्मिती